Vol. 1, Issue . 1 / February 2011, pp.148-153

Research Paper - History

# भाळव ीच्या -ाई -िंबाळ र घरा यातील परा मी पुरुष

श्री. दत्तात्रय ोर ा म ार

शिवछत्रपतीच्या स्वराज्य निर्मितीमध्ये मराठी मुलखातील अनेक घराण्यातील पराक्रमी पुरुषांनी मोलाचे योगदान दिले. ६ जुन १६७४ ला रायगडावर शिवराज्यभिषेक संपन्न झाला. ही एक युगप्रवर्तक अशी घटना सतराव्या शतकात भारतात घडून आली . या एकाच घटनेने भारतातील अंधारयुग समाप्त झाले.

या अंधारयुगाचा शेवट करण्यामध्ये भाळवणीच्या नाईक-निंबाळकर घराण्यातील सर लष्कर सिंधोजी नाईक -निंबाळकर यांनी सुमारेतीस वर्षे शिवरायांना साथ दिली.

सिधोजी नाईक-निंबाळकर शिवरायांच्या सांगाती अफजलखानाने केलेल्या स्वारी मध्ये शिवरायांच्या वतीने युध्दनिपुण सेनानायक म्हणून हजर होते.[१]

अफजलखानाच्या वधानंतर शिवाजीराजे पन्हाळ्य ापर्यंत आदिलशाही, मुलुख जिंकीत गेलेत्यात सिंधोजी पवार (निंबाळकर),गोदाजी जगताप, हिरोजी इंगळे, भिमाजी वाघ असेमोठे-मोठे सेनानायक हजर होते. त्यांनी आदिलशाही सैन्याचा पराभव करुन खान वधाच्या अठराव्या दिवशी बाई ते पन्हाळा हा विस्तीर्ण मुलुख स्वराज्याच्या झेंड्याखाली आणला. या युध्दात सिधोजी पवार (निंबाळकर) यांनी सादतखान या आदिलशाही सेनाधिकाऱ्यास तोंड दिले. शिवरायांची आज्ञा पाळून आदिलशाही सरदार रुस्तुमेजमान यास पळवून लावला.[२]

भाळवणीचेनाईक-निंबाळकर घराणे हे जगदेव रावांचे शिवरायांचे मेहुणे बजाजी नाईक यांचे ते सावत्र भाऊ.

नाईक-निंबाळकर घराणेमूळचे परमार होत. माळव्यात त्यांचे राज्य इस्लामी आक्रमणात नष्ट झाले. त्यांचे वंशज महाराष्ट्रात निंबळक येथे राहिले. त्यावरुन निंबाळकर हे नाव त्यांना पडले.[३]

अफजलखान वधापासून शिवरायांच्या जालना मोहिमेपर्यंतच्या सर्व मोहिमा आणि लढायामध्ये सिधोजींचा सहभाग होता. त्यांचा पराक्रम आणि शौर्य पाहूनच त्यांना शिवरायांनी घ्सरलष्करड पद दिले होते. तसेच त्याना घ्सेनापंचसहस्त्रीड असा मोठा हुद्दा ही देण्यात आला होता.[४]

सन १६५९ सालच्या अफजल मोहिमेनंतर शिवरायांची रायगडावर राज्यभिषेकाची लगबग आणि तयारी चालू होती. नेमके त्याच वेळी आदिलशाही सरदार बहलोल खान स्वराज्यावर चालून आला होता. बहलोलखान अतिशय शूर व विजापूर दरबारातील पठाणी पक्षाचा प्रमुख होता. मिरज व बंकापूरची जहागिरी त्याच्याकडेच दिली होती.[५]

शिवाजी महाराजांनी औरंगजेबाच्या मोगली सैन्याशी उघड्या मैदानावर दिलेले पहिले युध्द. त्यालाच घ्साल्हेरचे युध्दड म्हणतात. या युध्दात मोगलांचे३० मोठे अंमलदार मराठ्यांनी कैद केले. इख्लासखान मियाना व मुहकमसिंह चंद्रावत जखमी होऊन मराठ्यांच्या हाती सापडले. या युध्दात सिधोजी नाईक-निंबाळकर हे जातीने हजर होते. मोगल-मराठ्यांची उघड्या मैदानावर एवढी प्रचंड लढाई ही प्रथमच झाली होती. इ. स. १६७२ च्या आरंभी हे युध्द झाले. विजयी विरांना अपरंपार द्रव्य बक्षीस म्हणून दिले. विजयाची खबर ऐकून राजेबहुत

खुशहाल झाले. तोफा मारल्या, साखरा वाटल्या, बातमी आणणाऱ्या जासुदांच्या हातात सोन्याची कडी घातली अशी नोंद इतिहासात झाली आहे. ६ असा हा पराक्रमी सरदार स्वराज्यावर चालून आला असता त्यावर शिवरायांनी प्रतापराव गुजर सेनापती यांची रवानगी केली होती. महाराजाच्या आज्ञेप्रमाणे चाल करुन प्रतापरावांनी बहलोलखानाला उमराणीजवळ गाठले. तेथील पाणीसाठी मराठी सैन्याने ताब्यात घेऊन नाकेबंदी केली. रुपाजी भोसले, सोमाजी मोहिते आणि सिंधोजी निंबाळकर यांनी पराक्रम करुन बहलोल खानास शरण येण्यास भाग पाडले. या उमराणीच्या युधद्‌त विजापूर करावा एक हत्ती मदोन्मत होऊन अनेकांना ठार मारु लागला. त्या हत्तीला शांत करुन सिंधोजी निंबाळकरांनी मराठ्यांकडे आणला. मोठा पराक्रम केला.[७] राज्यभिषेकाचे पूर्वी अपशकुन करण्याचा आदिलशाही डाव या पराक्रमी वीरांनी हाणून पाडला.

सेनापंचसहस्त्री सिधोजी नाईक-निंबाळकर यांनी शिवछत्रपतींना जालना स्वारीच्या वेळी मोलाचे सहकार्य करुन स्वराज्य सेवेसाठी आपला देह धारातीर्थी अर्पण केला. सन १६७९ साली स्वत: छत्रपती शिवाजी महाराज जालना स्वारीसाठी विजापूर जवळील सलगर (सेल्गुर) ठिकाणाहून निघाले. यावेळी मोगल सरदार दिलेरखान हा विजापूरला वेढा घालून बसला होता.[८]

विजापूरचे मदतीसाठी छत्रपती शिवाजी सलगर (सेल्गुर) येथे थांबले होते. त्यांचे सांगाती आनंदराव मकाजी आणि सिधोजी नाईक-निंबाळकरांसह सुमारेवीस हजाराचे सैन्य होते. या सैन्याचेदोन भाग करुन त्यातील आठ नऊ हजार सैन्याचा एक भाग घेऊन स्वत: छत्रपती शिवाजी महाराज दिलेरखानाचेलक्ष दुसरीकडे वेधण्यासाठी जालन्या पर्यंतचा प्रदेश लुटमार करीत निघाले. जालना पेठ महाराजांनी चार दिवस लुटली. अत्यंत श्रीमंत अशा या पेठेत महाराजांना सोने, रुपे, हत्ती, घोडेव अगणित मालमत्ता सापडली.

सर्व लुटीसह महाराज पट्टागडाकडे निघाले असता वाटेतच औरंगाबादहून रणस्तखान, आसफखान, जाब्दीखान, केसरीसिंग, सरदारखान व अन्य आठ -दहा हजाराचे सैन्य महाराजांवर चालून आले. जालना स्वारीतून आणलेली लूट आणि स्वत: महाराजांचा जीव धोक्यात आला असता सिधोजी नाईक-निंबाळकर यांनी मोगली सैन्याला थोपवून धरले. महाराज व काही सैन्यासह आणलेली लूट पट्टा किल्ल्याकडे सुखरुप जाऊ देण्यास मदत केली. सतत तीन दिवस मोगलांचे भारी फौजेला तोंड दिले. या झालेल्या युध्दात त्यांना वीरमरण प्राप्त झाले. ९ मुघल विरोधातील या लढाईत सिधो जीरावांना गोळा लागून तेठार ही झाले.[१०]

छत्रपती शिवाजी महाराज आणि मौल्यवान लूट सुरक्षित राहण्यास मोकळी वाट करुन देऊन स्वत: मृत्यूची वाट पराक्रमाने चोखाळणारे सरलष्कर सिधोजी नाईक-निंबाळकर यांची ही अद्वितीय अशीच कामगिरी असून त्याची नोंद सर्वच इतिहासकारांनी घेतली आहे.

भाळवणीच्या नाईक-निंबाळकर घराण्याची ही पराक्रमाची परंपरा येथून पुढेथेट १५० वर्षे अव्याहत पणेटिकून राहिली.

साल्हेरचे युध्द हे समोरासमोर रणांगणावर मराठे - मोगल यांच्यात झालेला पहिला रणसंग्राम होय. या प्रसंगाप्रमाणेच बहलोलखानाशी प्रतापराव गुजर सरनोबत यांनी दिलेली झुंज व त्याची शरणागती जालना स्वारी छत्रपतींच्या आयुष्यातील अखेरची मोहिम या मराठ्यांच्या इतिहासातील महत्वाच्या ऐतिहासिक घटना होत. या सर्व प्रसंगी भाळवणीचे सरलष्कर सिधोजी नाईक-निंबाळकर यांनी शिवाजी महाराजांना मोलाची साथ दिली. जालना स्वारीत छत्रपतींना व सोबतच्या खजिन्यात पुढेजाऊ देण्यात मोलाची कामगिरी करुन युध्द क्षेत्रावर देह ठेवला. असा पराक्रम करणारेते एकमेव ऐतिहासिक व्यक्तिमत्व आहे. असे म्हटले तर वावगेठरु नये.

सातार-पंढरपूर या राजमार्गावर या नाईक-

निंबाळकरांचा ऐतिहासिक वाडा अद्याप काहीसा सुस्थितीती असलेला आपणास दिसतो. या वाड्याचे क्षेत्र अंदाजे तीन एकरावर आहे. त्याकाळचे ऐतिहासिक अवशेष मोडक्या-तोडक्या अवस्थेत जपत हा लढाऊ वाडा ऊन , पाऊस आणि वादळवाऱ्याशी पूर्वजा प्रमाणे झुंजत उभा आहे.

महाराष्ट्रातील पराक्रमाची यशोगाथा ही भव्य वास्तू जतन व्हावी , भावी पिढ्यांना त्याचा परिचय मिळत रहावा म्हणून तिची डागडुजी व्हावी, चांगली निगा राखावी असे कुणाच्या मनीध्यानी येत नाही. ही या वास्तुची शोकांतिका आपल्या इतिहासाचे आस्थेबाबत प्रश्न निर्माण करते, हे मात्र खरे।

भाळवणीच्या घराण्यात पुढे हणमंतराव नाईक-निंबाळकर , हैबतराव नाईक-निंबाळकर, सुलतानजी नाईक़-निंबाळकर , दर्याबाई नाईक-निंबाळकर, लिंबाजी नाईक-निंबाळकर, खंडेराव-निंबाळकर अशी एकापेक्षा एक सरस पराक्रमी पुरुषांची परंपराच निर्माण झाली. त्यांचेहातून झालेल्या पराक्रमाचा संक्षिप्त तपशिल पुढीलप्रमाणे:-

**हणमंतराव निंबाळकर :**

हणमंतराव निंबाळकर बादशहा औरंगजेब दक्षिणेत आल्यानंतर मोगलांच्या सेवेत गेल्याचेदिसून येते. त्यांना ७०० जात व ५०० स्वार अशी मनसबदारी सन १६८४ साली बादशहानेदेऊ न बारामतीच्या ठाण्यावर नेमलेहोते. हणमंतराव नाईक-निंबाळकर तेथून पुढेसन १६९३ पर्यत बारामतीच्या ठाण्यावर होते.

राजाराम छत्रपती जिंजीहून सुटून स्वराज्यात परत आल्यांनतर बादशाही छावणी ब्रह्मपुरी येथेहोती. त्यावर छापा घालून कैदेतील शाहूराजेयांना सोडविण्याचा प्रयत्न केला. मोगली मुलखात धामधूम करणारेसरदार वाटेत राजाराम महाराजांना येऊ न िमळाले. त्यात परसोजी भोसले, हणमंतराव निंबाळकर, आटोळेहेप्रमुख सरदार होते.११

तिकडून(मोगलांकडून) तमाम मराठेलोक होते. तेआपल्या जमावनिशी आम्हाकडेयेताती. हल्ली राजश्री हणमंतराऊ निंबाळकर, सटवाजी निंबाळकर व मानेसरदार आलेआहेतीथ असेखंड बल्लाळचेपत्रात नमूद आहे. हणमंतराव निंबाळकरांना धनाजी जाधवाचेसरदार असताना थेट सेनापती संताजीवरच चालून जाण्याची वेळ आली. छत्रपतींनी संताजीचेसेनापतीपद काढून घेतलेनंतर त्यास पकडून आणण्याचा हुकूम धनाजी जाधवास दिला होता. छत्रपतींच्या हुकुमाप्रमाणेहणमंतराव निंबाळकरांनी दहिगांव ता. माळशिरस जवळ त्यांचेवर मार्च १६९७ मध्येहल्ला केला. संताजीकडेजुजबी फौजफाटा असल्यानेआणि त्यांचेलष्कर सोडून गेलेलेअसल्यानेमहादेवाच्या डोंगराकडेमाघार घ्यावी लागली होती. [१२] याशिवाय हणमंतराव नाईक-निंबाळकर पराक्रमानी केलेली स्वराज्य सेवा थोडक्यात अशी

✐२७ डिसेंबर १६९९ रोजी हणमंतराव निंबाळकर यांनी प्रमुख मोगली सरदार इख्लासखान व त्याचा पुत्र यास साताऱ्याजवळ युध्दात ठार केले.

ब) १० जानेवारी १७०० रोजी झुल्फिकारखान या सेनापतीस रहिमतपुराजवळ गाठून मोठी लढाई केली. झुल्फिकारखानाचा पराभव करुन त्यास माघार घ्यावी लागली. [१३]

संताजी घोरपडेयांना ठार मारल्यानंतर जाधव व घोरपडेपुत्र यांचेवैमनस्य आले. उभयतांची लढाई ११/०९/१७०१ रोजी नीरेच्या काठी झाली. त्यात धनाजी जाधवाचा सहाय्यक हणमंतराव निंबाळकर सरलष्कर घोरपड्यांचेहाती पाडाव आला.१४ राजाराम महाराजांचेकडेहणमंतराव निंबाळकर येऊ न सामील झाल्यानंतर राजाराम महाराजांनी त्यांना घ्सरलष्करड पद आणि जरीपटका देऊन त्यांचा बहुमान केला होता. त्यांना गंगथडी म्हणजेगोदावरी भागात धामधूम करुन वसूल गोळा करण्यास कामगिरी दिली होती. [१५] असा हा पराक्रमी सेनानी वाकिनखेड्याच्या नाईकाचेमदतीसाठी

जात असता वाटेत १७०५ साली मृत्यू पावला.[१६]

**हैबतराव निंबाळकर:**

हणमंतराव निंबाळकरांचेमृत्यूनंतर हैबतराव यांचेकडेसरंजाम आला. सन १७०८ सालापर्यत तेताराबाईच्या पक्षात होते. सन १७०८साली तेताराबाईची बाजू सोडून शाहूराजेंच्या पक्षात आले. त्यांना शाहू छत्रपतींनी वडिलांचेसरलष्करपद दिले.[१७]

हैबतरावाची कामगिरी:

धनाजी जाधव सेनापती यांचा पुत्र चंद्रसेन जाधव यांनी हरीणाचेतंट्याचेनिमित्त करुन शाहू महाराजापासून दूर गेलेहोते. बाळाजी विश्वनाथ यास आमचेहवाली करा नाहीतर आम्हास धन्याचेपाय सुटलीलड असेसांगून शाहूपासून फुटून गेलेहोते.

त्यांना अद्दल घडविणेसाठी शाहू छत्रपतींनी सरलष्कर हैबतराव यांना चंद्रसेन जाधवावर रवाना केलेहोते. आदरकीच्या घाटात उभयतांचे युध्द झाले. चंद्रसेन जाधवाचा त्यात पराभव होऊन ते पन्हाळ्याकडे पळून गेले.[१८]

चांदा येथेशाहू महाराजांकडून लढत असताना हैबतराव निंबाळकर मारले गेले. नागपूरचेकान्होजी भोसले शाहूंच्या आज्ञेप्रमाणे त्या भागात मोहिमेवर होते. त्यांचे मदतीसाठी शाहूंच्या आज्ञेप्रमाणे हैबतराव निंबाळकर तिकडे गेलेअसता लढाईत सन १७०५ मध्ये मारले गेले.[१९]

**सुलतानजी निंबाळकर :**

हैबतराव निंबाळकरांचे सरलष्करपद शाहू महाराजांनी त्यांचा पुत्र सुलतानजी यास दिले. सन १७१६ साली चंद्रसेन जाधवाने शाहू छत्रपतींना पदावरुन हटविण्यासाठी मुहक्कमसिंग, तुरुफखाजखान , रंभाजी निंबाळकर यांचे सहाय्याने सातार्‍याकडे कूच केले. त्यावेळी सुलतानजी निंबाळकर, बाळाजी विश्वनाथ मोरेया सर्वांनी मोठी मदत करुन शाहू छत्रपतींवर कूच करुन आलेल्या या सर्वांना पिटाळून लावले.

सुलतानजी निंबाळकर औरंगाबाद प्रांती आणि गोदावरी प्रदेशात वसूल करुन अंमल बसवीत असताना त्यांचे वर मोगलांना सामील झालेला चंद्रसेन जाधव व इतर सरदार चालून आले. या सर्वांना सुलतानजी निंबाळकर यांनी गोदावरी काठी लढाई देऊन पि टाळून लावले.२० सन १७२५ मध्येशाहू छत्रपतींच्या आज्ञेप्रमाणे बाजीराव पेशव्यांच्या कर्नाटकात मोहिमेत ते सामील झाले. विजापूर मार्गेते चित्रदूर्ग पर्यंत गेले. त्यांनी मराठ्याचे चौथाईचे हक्क प्रस्थापित केले.[२१]

या मोहिमे नंतर मात्र सुलतानजी आणि शाहू छत्रपती यांचेत काही विकल्प आले. निजाम मराठ `सरदारात फूट पाडून आपले बस्तान मजबूत करीत होता. त्यास शाहूला हलका करावयाचे होते. शाहू छत्रपतींनी मनात काही विकल्प आल्याने सुलतानजीस मोहिमेवर न पाठवता सातार्‍यास बोलावून घेतले. त्यांचेकडील सरलष्करापद काढून घेवून ते सिधोजी निंबाळकर या सुलतानजीच्या बंधूस दिले. सुलतानजी निजामाकडे गेले. निजामाने त्यास बीड, अंबड, धारुर, पाथरी येथे पाच लाखांची जहागीर दिली. राहण्यासाठी धारुर किल्ला दिला. निजामाकडे गेलेले सुलतानजी सन १७४८ पर्यंत निजामाकडेच राहिले. सन १७४८ मध्ये त्याचा मृत्यू झाला. बाजीराव पेशव्यांचे बरोबर सन १७२४ मध्ये सुलतानजी साखर खेड्याच्या लढाईत हजर होते. यातील पराक्रमाबददल त्यास महब्बूर दस्तगाह (वीरोत्तम) अशी पदवी निजामाने दिली होती. याच लढाईतील विजयाने निजाम हैद्राबादच्या गादीवर कायम झाला . सुलतानजी निंबाळकर यांनी खर्डे या ठिकाणी गढी बांधली. गावाबाहेर छोटा किल्ला बांधला. तो अद्याप सुस्थितीत आहे. या घराण्यास पुढे खर्डेकर निंबाळकर म्हणू लागले.

सुलतानजी निंबाळकराची सून दर्याबाई निंबाळकर ही महाराणी ताराबाईची नात होय. शाहू महाराजांच्या सातारा येथील निधनानंतर दर्याबाईचे बंधू घ्रमराजेड हेसातारा गादीवर छत्रपती म्हणून आले. सातारा या राजधानीत त्यावेळी खूप घडामोडी झाल्या.

छत्रपती रामराजांचेसर्व पूर्व आयुष्य अज्ञातवासात गेले होते. त्यांना मराठी राज्याचेहीत डोळ्यापुढे ठेवून दर्याबाईनी पेशवेयांना राज्याची जबाबदारी देण्याची मसलत दिली. सांगोला करारानेपेशवेमराठी दौलतीचे प्रमुख झाले. पेशवाई सन १७५० पासून पुण्यातून सुरु झाली. या घडामोडीत दर्याबाईंनी महत्वाची भूमिका बजावली. छत्रपतींनी त्यांना दिलेले पानगांव या जहागिरीचे गावी त्यांचे वास्तव्य असे. सुलतानजी निंबाळकरांचे पुत्र निंबाजी नाईक-निंबाळकर हे दर्याबाईंचे पती। सांगोला कराराने ते पद पुत्र निबाजी नाईकांना दर्याबाईने प्राप्त करुन दिले.

सांगोला कराराने छत्रपती नामधारी झाले. पेशवे हे सर्व सत्ताधीश झाले. पण नाईक-निंबाळकरांच्या घराण्याची शौर्याची आणि पराक्रमाची सिधोजी निंबाळकरा पासूनची शौर्य परंपरा खंडीत झाली नाही. पेशवाईत आणि उत्तर वाईच्या काळातही ती चालू राहिल्याचे दिसून येते.

पानिपतच्या रणसंग्राम हा भारतभूमीत घडलेला एक महासंग्राम होय. या संग्रामात पेशवेसदाशिवराव भाऊ आणि विश्वासराव मृत्यू पावले. दोन मोती गळाले. सत्तावीस मोहरा हरपल्या आणि रुपये खुर्दा याची गणती नाही असे वर्णन या लढाईबाबत केलेले आहे.२३ या लढाईत सत्तावीस मोहरा हरपल्या असा आलेला उल्लेख म्हणजे या युध्दात मराठ्यांचे नामांकित सत्तावीस सरदार युध्द भूमीवर ठार पडले. त्यात भाळवणीचे खंडेराव नाईक-निंबाळकर हे पराक्रमी सरदार होत.[२४]

याचे खंडेराव नाईक-निंबाळकरांनी पानिपतच्या युध्दभूमीवर सदाशिवभाऊं चे सल्लागार बहवंतराव मेहेंदळेयांचा मृत्यू ७ डिसेंबर १७६० रोजीचे गिलच्या बरोबर झालेल्या लढाईत झाला. त्यावेळी शत्रू पक्षाकडून त्यांचे शीर कापून नेत असता त्यांचे प्रेतावर खंडेराव पडून शत्रूस शीर कापू दिलेनाही.[२५] खंडेराव नाईक-निंबाळकर हे राघोबा पेशव्यांचे हाताखालील फौजेत सन १७५७ साठी उत्तरेत गेले होते. राघोबाचे या मोहिमेत मराठे अटकेपार होऊन अटकेचा किल्ला मराठ्यांच्या ताब्यात आला होता. त्यामुळे त्यांच्या पराक्रमाची नोंद सातारा दरबारात होऊन पुढे त्यांच्या वंशजास कोळेगाव सातारा छत्रपतींनी दिले आहे.

पानिपत युध्दानंतर माधवराव पेशवे आणि राघोबा पेशवे यांचे मतभेद वाढून राघोबाने बंडखोरी करुन प्रसंगी इंग्रजाचा आश्रय घेतला. गुजरात प्रांतात जाऊन इंग्रजाचे मदतीने माधवरावांना शहर देण्याचे कारस्थान चालू केले. पुणे दरबारातून याचा बंदोबस्त करण्यासाठी पेशवे सरकारचे सेनापती हरीपंत फडके रवाना झाले. त्यांचे सांगाती खंडेराव नाईक-निंबाळकर यांचे पुत्र शहाजी नाईक-निंबाळकर आपले पथकानिशी होते. इंग्रज फौज राघोबाची फौज आणि पेशव्यांची फौज यांची धुमश्चक्री नर्मदा तिरी बाबा पिराचेघाटावर झाली. ही लढाई १८ मे१७७५ रोजी घाटावर होऊन त्यात पेशव्याकडील शहाजी नाईक़-निंबाळकर तोफेचा गोळा लागून ठार झाले. या कामगिरीबदद्ल त्यांचे पराक्रमाची नोंद सातार दरबारात झाली. त्यांनी तांदुळवाडी परगणेभाळवणी प्रांत, सरकार विजापूर या गाव इनाम करुन दिला आहे. २६ उत्तर पेशवाईच्या काळात ग्वाल्हेरच्या शिंदेबायांनी पेशव्यांचे विरुध्द बंडाळी करुन त्यांचे मुलखांत धुमाकूळ घातला. त्याची तोशीस भाळवणी गावास बसली. अरब सैनिकांनी भाळवणी वाड्यावर चाल करुन लुटालूट चालू केली. देवजी गौसी या सरदार काकडे शिंद्याच्या फौजेची नेतृत्व होते. या लुटारु फौजेने त्यापूर्वी पेशव्यांचे मुलखातील इंदापूर, पळसदेव, दहिगांव, निमसाखर , बावडा, टणू, निरानसिंगपूर या ठिकाणी धाडी घालून लुटालूट केली होती. त्याचा कुठे प्रतिकारच झाला नव्हता. मात्र भाळवणी या गावी शिंद्याच्या या लुटारु फौजेला भाळवणीचे दणगोजी नाईक-निंबाळकर यांनी जोरदार प्रतिकार करुन या लुटारु फौजेस फारसे काही करता आले नाही. गावात वणगोजी नाईक -निंबाळकर यांचे दोघा पुतण्यांनी त्यांना प्रतिकार केला. जखमा झालेनंतर दोघे पुतणे गावात गेले. मात्र तरीही आता उरलेल्या लोकानिशी वाडा शिंद्यांचे लुटारु

फौजेबरोबर लढतच होता. म्हणून घ्वाडा अद्याप लढत आहेत. अशी या प्रसंगाची नोंद इतिहासात झाली आहे.

उत्तर पेशवाईच्या काळी पुणे दरबारातून वतनाच्या घालमेली चालू झाल्या. त्यात भाळवणीचे नाईक-निंबाळकरांचे ही काही महाल, वतने कमी-जास्त झाली असावीत. सन १८०३ साली या भाळवणीचे नाईक-निंबाळकरांचे रुपये ५२००० चेउत्पन्न असल्याची नोंद इतिहासात झाली आहे.

पुणे पुराभिलेखातील कागतपत्रांच्या संदर्भावरुन तर्फ भाळवणीत एकूण २७ गावे होती . ती यापमाणे.[२८]

| | |
|---|---|
| १) कसबा | १३) पिलीव |
| २) महीम | १४) कुसमोड |
| ३) मोहदबू | १५) खर्डे |
| ४) सेगाम | १६) कुरोली |
| ५).......... | १७) तांदुळवाडी |
| ६)............ | १८) मोहूद खु |
| ७) उपरी | १९) घोडेगांव |
| ८) भाळवणी खु ॥ | २०) शिंगोर्णी |
| ९) कोचेगाव | २१) बचेरी |
| १०) दसूर | २२) खळवे |
| ११) वाडी | २३) पळसी |
| १२) शेंडेचिंच | २४) गारडी |

यातील तीन गावांची नावे मिळत नाही.

भाळवणी या घराण्याचा तीनशे वर्षापूर्वीच्या पराक्रमाची ही यशोगाथा आहे. सातार-पंढरपूर रस्त्याने प्रवासात भाळवणी गाव लागते. बस थांब्या जवळच गांव लागते. बस थांब्या जवळच तोवाडा उभा आहे. आदराने आपले मन त्या इतिहास वास्तूकडे पाहून झुकल्या शिवाय राहत नाही.

## संदर्भ


- ग. भा. मेहेंदळे, राजा शिवछत्रपती खंड-१, भाग-१, टीप २३५, १९९९, पृ.
- विजय देशमुख ,शककर्ते शिवराय, पूर्वार्ध, १९८४, पृ.३७३.
- गो. स. सरदेसाई ,ऐतिहासिक घराण्याच्या वंशावळी, पृ.७१.
- विजय देशमुख ,उक्त,पृ.३७३.
- कित्ता , पृ.९९३.
- कित्ता , पृ.७७३.
- कित्ता , पृ.९९४.
- कित्ता , पृ.९५६.
- कित्ता , पृ.९५७.
- डॉ. वि. गो.खोबरेकर, शिवकाल(१९३० ते १७०७), २००६, पृ.१७१.
- गो.स. सरदेसाई , मराठी रियासत ,खंड- २,१९८०, पृ.९४.
- कित्ता , पृ.२३०.
- कित्ता , पृ.२६५.
- कित्ता , पृ.२३२.
- ग्रँड डफ , हिस्ट्री ऑफ मराठा, १९१६, पृ.११५.
- सेतु माधवराव पगडी, मराठेव निजाम, उर्दू फारशी साधने, १९६३,पृ.२२.
- गो.स.सरदेसाई , मराठी रियासत खंड-३, १९८९, पृ. ३८.
- कित्ता , पृ.७७.
- कित्ता , पृ.१०५.
- कित्ता , पृ.२३९.
- कित्ता , पृ.२७३.
- गो.स.सरदेसाई ,पेशवेदप्तर खंड-१५, पृ.९०, १९६१.
- गो.स.सरदेसाई,मराठी रियासत खंड-४, १९९०,पृ.६५२.
- कित्ता , पृ.६६३.
- कित्ता , पृ.६११-१३.
- गोपाळ देशमुख, सोलापूर जिल्ह्याचा इतिहास, २००९, पृ.४५.
- कित्ता , पृ.४८.
- पुणेपुराभिलेख, संशोधनासाठी निवडलेलेकागदपत्र दप्तर पत्र क्रं. ३९२१०